D/Prasad२०२०/folder manai aadesh/Paryatan manae aadesh

**वा च ले :-**

१.सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसुचना क्र/करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२० नुसार महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम २०२०.
२. साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील ३४ (c) व ५१ (b)
४. भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८.
५.फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.

क्र/गृह/का.१/टे.३/मनाई आदेश/पर्यटक/एस.आर.क्र.२७/२०
जिल्हादंडाधिकारी कार्यालय पालघर
दि.१२/०६/२०२०.

## आदेश

ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे आणि जिल्हाधिकारी पालघर यांना पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

आणि ज्याअर्थी पालघर जिल्हयामध्ये मान्सून कालावधीत मोठया संख्येने पर्यटक धबधबे, तलाव, धरणे, किल्ले व समुद्र किनारी येत असतात व त्याठिकाणी जिवीतहानी होण्याच्या घटना घडत असतात. सद्यस्थितीमध्ये पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड-१९ चा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता, पावसाळयात पालघर जिल्हयामध्ये असलेले धबधबे, तलाव किंवा धरणे, समुद्र किनारे या ठिकाणी मोठया प्रमाणात पर्यटक पर्यटनासाठी आल्याने त्या ठिकाणी मोठया प्रमाणात गर्दी होण्याची व सामासिक अंतर राखले न गेल्यास तेथे कोव्हिड-१९ चा प्रसार व प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे त्या ठिकाणी पर्यटकांची सुरक्षा अबाधित रहावी व कोणत्याही प्रकारची जिवीतहानी होऊ नये म्हणून प्रतिबंधांत्मक आदेश लागू करणे गरजेचे आहे.

त्याअर्थी मी **डॉ.कैलास बा. शिंदे, जिल्हादंडाधिकारी पालघर** मला फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ३४ (C) आणि उपोद्घातातील अ.क्र.१ मधील शासन अधिसूचनेनुसार तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम, २०२० अन्वये पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन पालघर जिल्हयातील सर्व धबधबे, तलाव, धरणे, किल्ले व समुद्र किनारी येण्यास दि.१२/०६/२०२० ते दि.०९/०८/२०२० या कालावधीमध्ये मनाई आदेश लागू करीत आहे.

सदरच्या मनाई आदेशाचा भंग केल्यास संबंधितांविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील ५१ (b) नुसार कारवाई करण्यात येईल.

सदरचा मनाई आदेश आदेशातील उक्त नमुद ठिकाणी व्यक्ती/संस्था इ. यांचेकडून चित्रिकरण, सामाजिक उपक्रम/ कार्यक्रम इत्यादिंसाठी संबंधित विभागाकडून पुर्व परवानगी घेतलेल्या कार्यक्रमांना लागू असणार नाहीत.

सदरचा आदेश आज दि.१२/०६/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

**सही/-**
**(डॉ.कैलास बा. शिंदे)**
**जिल्हादंडाधिकारी पालघर**

**प्रत:-**

१) मा.विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना माहिती वआवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना माहिती वआवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

४) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी व प्रसिध्दीकरीता अग्रेषित.
५) पोलीस अधीक्षक पालघर महामार्ग पोलीस ठाणे यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
६) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार / पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी व प्रसिध्दीकरीता.
७) उपविभागीय दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/जव्हार/वाडा यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
८) तहसीलदार वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
९) उप परिवहन प्रादेशिक अधिकारी, वसई यांना माहिती तथा पुढील कार्यवाहीसाठी.
१०) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांना पुढील कार्यवाहीसाठी.
११) जिल्हा माहिती अधिकारी पालघर यांना माहिती तथा प्रसिध्दीकरीता.

जिल्हा दंडाधिकारी पालघर
जिल्हा पालघर

जिल्हादंडाधिकारी पालघर